# परीक्षा व मूल्यमापन कक्ष
# सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे

(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)
(पूर्वीचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे)
शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५
E-mail: examcell@coeptech.ac.in Phone: +91-20—25507073 Fax: +91-20-25507299 website : www.coep.org.in


जा क्र. - सीओईपी तं वि/प व मू क/२०२४/३४४ दि. २९/१०/२०२४

**परिपत्रक क्र. : १०/२०२४**

**विषय :- लेखी परीक्षेच्या वेळी (परीक्षेची वेळ सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंतच्या वेळात) विद्यार्थ्यांना स्वच्छतागृह वापरण्याबाबत.**

उपरोक्त विषयांन्वये सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात आयोजित केल्या जाणाऱ्या सर्व लेखी परीक्षेच्या (उन्हाळी सत्र परीक्षा, MID-Term परीक्षा व हिवाळी सत्र परीक्षा) वेळी (परीक्षा सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंतच्या वेळात) विद्यार्थ्यांना स्वच्छतागृहाचा वापर करण्यास सक्त मनाई असेल. तथापि, काही विद्यार्थ्यांना वैद्यकीय समस्येच्या कारणाने स्वच्छतागृहाची गरज भासू शकते अशा विद्यार्थ्याने संबंधित विभागाला अर्ज करून संबंधित विद्याशाखा सल्लागार, विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांची मान्यता घ्यावी, व परवानगी पत्र आणि वैद्यकीय प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सोबत बाळगावे. परीक्षा कक्षेतील पर्यवेक्षकांनी त्या विद्यार्थ्यांचे परवानगी पत्र आणि वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत यांची पडताळणी करूनच सदरील विद्यार्थ्यांस स्वच्छतागृहासाठी परवानगी द्यावी.

कुलसचिव,
सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे.

प्रत :- सर्व विद्याशाखा सल्लागार, विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता, त्यांना कळविण्यात येते की त्यांनी सदरील परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.